# Network System A.M.C.

## दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते कि, जिल्हा न्यायालय कोल्हापूर मुख्यालयातील Computer LAN System अखंडीत सुरू रहावी या करिता (Networking System with all components ) यांची स्थानिक पातळीवर वार्षीक दुरूस्ती व देखभाल करार **Comprehensive-AMC (of Lan with all cable and 35 switches)** करणेचे आहे. तसेच इच्छुक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून दोन दिवसाच्या आत **Networking System** ची पहाणी करणे करिता मा. जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देउन सदरची निविदा भरणेचे आहे. तरी नोंदणीकृत सेवाधारकाकडून ही जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक २६/०४/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत. याची निविदाधारकानी नोंद घ्यावी तरी ज्यांना निवीदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दि. २६/०४/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहचतील अशा रितीने निवीदा भरावेत.

हुकूमावरून,

प्र. अधिक्षक (वित्त),

जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर.

दिनांक - ०८/०४/२०२४

## Network System A.M.C. दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

१) जी. एस. टी. चे बील असणा-या पुरवठादारांना प्राधान्य दिले जाईल.

२) वॉरंटी काळात काही साहित्य खराब झालेस ते सिध्द करणेची जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची राहील.

३) निवीदा भरत असताना संपूर्ण करासहीत निवीदा भराव्यात.

४) खरेदी केलेली वस्तूंची तपासणी करुन दिलेशिवाय बिल केले जाणार नाही. तसेच तपासणी करुन देतेवेळी एखादया वस्तूमध्ये बिघाड झाल्यास ती वस्तू नवीन दयावी लागेल.

५) महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निवीदा भरु नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

६) खरेदी कालावधी तसेच नंतर एखादे वस्तूची वाढीव मागणी झालेस मंजूर निवीदेतील दराप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

७) पुरवठादारांना वस्तु खरेदी करणेच्या कंपनीचे किंवा डिलरचे ऑथरायझेशन असलेस प्राधान्य दिले जाईल.

८) खरेदी केलेल्या वस्तु मागणीपत्र दिलेपासुन सात दिवसाचे आत पुरवठा करणे बंधनकारक आहे.

९) वॉरंटी काळात दुरुस्ती करणेकरिता वेगळा सर्व्हीस चार्ज दिला जाणार नाही.

१०) वाद-विवाद झालेस न्यायालयीन कार्यकक्षा कोल्हापूर राहील.

११) निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतीम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो कोल्हापूर यांना राहतील.

१२) एखादया निवीदाधारका विरुध्द खरेदी प्रक्रिये संदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निवीदा भरु नयेत, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

१३) पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निवीदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निवीदा भरणेची आहे. अन्य निवीदेचा विचार केला जाणार नाही.

१४) पुरवठादारांनी वस्तुचे वॉरंटीचा कालावधी नमुद करणे बंधनकारक आहे.

**<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>**

१) संगणक विभागप्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते कि, सदरील निवीदा जिल्हा न्यायालय, कोल्हापुर च्या (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशीत करणेत यावी.

२) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर नोटीस बोर्ड.